16-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/15/2025 11:00 PM Page 1



# पर्यटकांमध्ये भटक्या कुत्र्यांची भीती

## समुद्रकिनाऱ्यांवर भटक्या कुत्र्यांच्या संख्येत वाढ : संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने द्यावे

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १५ :** गोव्याच्या प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवर भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे परदेशी पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चावण्याच्या आणि आक्रमक वर्तनाच्या घटनांमुळे पर्यटकांच्या सुट्टीतील आनंदात व्यत्यय येत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. दक्षिण गोव्यातल्या केळशी आणि कोलवा किनाऱ्यांपासून ते उत्तरेकडील हणजूण आणि वागातोर सारख्या हॉटस्पॉटपर्यंत अशा प्रकारच्या घटनांची नोंद झाली आहे.

याबाबत ब्रिटनहून आलेल्या ४५ वर्षीय पर्यटक एम्मा थॉम्पसन यांनी चिंता व्यक्त केली की, गोवा हे अतिशय सुंदर ठिकाण आहे, परंतु भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे अनेक पर्यटकांच्या अनुभवांवर परिणाम होत आहे. हे प्रकरण अधिकाऱ्यांनी तातडीने हाताळण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

स्थानिक शॅक चालक, मच्छीमार, जीवरक्षक आणि हॉटेल कर्मचाऱ्यांनी जखमी पर्यटकांना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल पीडितांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. मात्र, अनेक पर्यटकांनी त्यांच्या खोल्यांमध्ये बंदिस्त राहण्याची वेळ आल्याचे आणि फॉलो-अप उपचारांसाठी डॉक्टरांकडे वारंवार जाण्यामुळे मौल्यवान सुट्टीचा वेळ वाया गेल्याचे सांगितले.

इंग्लंडमधील निवृत्त शिक्षक रॉबर्ट जेनकिन्स यांनीही आपली नाराजी व्यक्त केली. मी याआधीही गोव्याला भेट दिली आहे, परंतु हे असे काहीतरी आहे जे मागील सहलींमध्ये अनुभवले नव्हते. नेहमीच स्वागतशील असलेल्या गोव्याचा हा बदल पाहून चिंता वाटते, असे त्यांनी सांगितले.

इंग्लंडहून वारंवार येणाऱ्या पर्यटकांचे म्हणणे आहे की अशा घटनांमुळे गोव्याबद्दल त्यांची धारणा बदलली आहे. सकाळी आणि संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर फिरण्याचा आनंद लुटणाऱ्या अनेकांना आता भटक्या कुत्र्यांच्या टोळ्यांची भीती वाटू लागली आहे. त्यामुळे अनेक पर्यटक नियोजित उपक्रमांपासून वंचित राहत आहेत.

ही समस्या सोशल मीडियावरही जोर धरत असून, अनेक पर्यटकांनी आपले अनुभव ऑनलाइन शेअर केले आहेत. यामुळे गोव्याच्या पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

या समस्येच्या पार्श्वभूमीवर काही स्थानिक अधिकाऱ्यांनी तात्काळ पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. केळशी पंचायतीने मिशन रेबीजसोबत भागीदारी करून भटक्या कुत्र्यांसाठी निवारा स्थापन करण्याची योजना आखली आहे. तथापि, पर्यटन उद्योगातील प्रतिनिधींनी अधिक व्यापक सरकारी हस्तक्षेपाची गरज असल्याचे म्हटले आहे. जर या समस्येकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर भटक्या कुत्र्यांचा धोका गोव्याच्या पर्यटन व्यवसायाला मोठा धक्का देऊ शकतो, असा इशारा पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिला आहे.

# ओल्ड गोवात बफर झोनमधील बांधकाम परवान्याला विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १५ : सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीने (एसओजीएसी) ओल्ड गोवा गाव पंचायतीला लिहिलेल्या पत्रात वारसा स्थळांच्या बफर झोनमध्ये प्रस्तावित इमारतीसाठी बांधकाम परवाना देण्यास तीव्र आक्षेप नोंदवला आहे. पूर्वी केवळ ग्राउंड प्लस वन मजल्यासाठी डिझाइन केलेल्या या इमारतीसाठी आता ग्राउंड प्लस अतिरिक्त दोन मजल्यांसाठी परवाना मागण्यात आला आहे, अशी माहिती एसओजीएसीच्या अध्यक्षा फातिमा परेरा यांनी दिली.

परेरा यांनी ग्रामपंचायतीला सादर केलेल्या पत्रात म्हटले आहे की, विद्यमान रचना केवळ ग्राउंड प्लस वन मजल्यासाठी डिझाइन करण्यात आली होती. विद्यमान आरसीसी रचना दोन अतिरिक्त मजले सहन करण्यास सक्षम आहे की नाही, हे स्पष्ट नाही. तसेच पात्र स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून कोणताही तपशीलवार स्ट्रक्चरल स्थिरता अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

परेरा यांनी अर्जदाराला प्रमाणित स्ट्रक्चरल कन्सल्टंटने तयार केलेला व्यापक स्थिरता अहवाल पुन्हा सादर करण्याची सूचना देत अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. तसेच, प्रस्तावित इमारतीच्या आराखड्यात स्विमिंग पूलसाठी केलेल्या तरतुदींवरही त्यांनी आक्षेप घेतला आहे. गावात आधीच पाण्याचा तुटवडा आहे. अशा परिस्थितीत स्विमिंग पूलमुळे पाणीपुरवठ्यावर अनावश्यक भार पडेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

परिसरातील पाण्याच्या तुटवड्यावर उपाययोजना करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र पाठवण्याची मागणीही परेरांनी केली आहे. त्यांनी पाणीपुरवठा आणि त्याच्या नियोजनासाठी कृती आराखडा तयार करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून ग्रामपंचायतीला पाणी-केंद्रित प्रकल्पांना परवानगी देण्याच्या निर्णयास मदत होईल.

परेरांनी २० जून २०२४ रोजी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी विधानसभेत दिलेल्या विधानाचा उल्लेख केला, ज्यात त्यांनी स्पष्ट केले होते की, वारसा स्थळांच्या बफर झोनमध्ये कोणत्याही नवीन बांधकामाला परवानगी दिली जाणार नाही.

प्रस्तावित बांधकाम हे प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष (सुधारणा आणि प्रमाणीकरण) कायदा, २०१० अंतर्गत नियुक्त केलेल्या ३०० मीटर नियंत्रित विकास बफर झोनमध्ये आहे. या कायद्याच्या कलम २० (क) आणि २० (ड) अंतर्गत इमारतीची उंची केवळ ग्राउंड प्लस वन मजल्यापर्यंत मर्यादित ठेवण्याचे स्पष्ट धोरण राज्य सरकारच्या संवर्धन समितीने निश्चित केले आहे. त्यामुळे प्रस्तावित ग्राउंड प्लस टू बांधकाम हे या धोरणाचे आणि मुख्यमंत्र्यांच्या विधानाचे स्पष्ट उल्लंघन आहे, असे परेरा यांनी स्पष्ट केले.

# सीआरझेड आणि इपीए उल्लंघन प्रकरणी तात्काळ कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १५ :** कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि पर्यावरण संरक्षण कायदा (ईपीए)च्या उल्लंघनाच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी कळंगुट मतदारसंघ मंच (सीसीएफ) ने अधिकाऱ्यांकडे केली आहे.

सीसीएफने मुख्य सचिव, गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना गुरुवारी सादर केलेल्या निवेदनात, गेल्या काही वर्षांपासून दाखल केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सततच्या दुर्लक्षामुळे पर्यावरणाचा ऱ्हास अनियंत्रितपणे सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सीआरझेडनियम आणि पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या उघड उल्लंघनांच्या अनेक तक्रारी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी कडे दाखल केल्या आहेत. मात्र, वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनधिकृत आणि पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या क्रियाकलापांना चालना मिळाली आहे, असे सीसीएफने निवेदनात म्हटले आहे.

सीसीएफ ने असा इशारा दिला आहे की, या उल्लंघनांमुळे गोव्याच्या नाजूक किनारी परिसंस्थेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. यासोबतच, प्रलंबित तक्रारींची तत्काळ सुनावणी घेण्याची आणि सततच्या उल्लंघनांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी काही उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत . यामध्ये सीआरझेड आणि ईपीए नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कामांवर त्वरित बंदी घालावी, पर्यावरणीय हानीचे प्रमाण मूल्यांकन करण्यासाठी सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच किनारी भागांचा पुढील विनाश रोखण्यासाठी उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी इत्यादी उपाययोजनांचा समावेश आहे

निवेदनात आग्वाद तुरुंग संकुलातील अनियमितता, कांदोळीमधील बांधकाम व्यावसायिकांनी केलेली सीआरझेड उल्लंघने, खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळवलेल्या बांधकाम परवानग्या आणि वाळूच्या ढिगाऱ्यांचा व समुद्रकिनाऱ्यावरील वनस्पतींच्या नाशासह अनेक आरोपांचा समावेश आहे.

या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पर्यावरण संरक्षणाची भावना कमकुवत होईल आणि अंमलबजावणी व जबाबदारी याबाबत शंका निर्माण होईल. गोव्याच्या किनारी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी त्वरित आणि निर्णायक कारवाई आवश्यक आहे, असे सीसीएफ ने स्पष्ट केले आहे.

# सरकारी पेन्शनधारकांना दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ **पालिकेचे दुर्लक्ष : योग्य उपाययोजना करण्यासाठी नागरिकांची मागणी**

**मडगाव, दि. १५ :** खलाशी आणि विधवांना अखेर दिलासा मिळाला असून, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांच्या थकीत पेन्शनच्या वाटपासाठी सरकारने ३.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून सरकारने एनआरआय व्यवहार कार्यालयाला वेळेवर निधी दिला नसल्यामुळे लाभार्थ्यांना मासिक २,५०० रुपयांचे पेन्शन मिळाले नव्हते. त्यामुळे अनेक लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले होते.

एनआरआय व्यवहार कार्यालयाने लाभार्थ्यांना नियमितपणे पेन्शन वाटप करता यावे यासाठी सरकारकडे एका आर्थिक वर्षासाठी ३.५ कोटी रुपयांचे अनुदान मागितले होते. अखेर सरकारने या मागणीला मंजुरी दिली आहे.

एनआरआय व्यवहार संचालक अँथनी डिसोझा यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, सरकारने ३.५ कोटी रुपये मंजूर केल्याचे पत्र आमच्या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. आम्ही लेखा संचालनालयाला निधी जमा करण्यासाठी पत्र पाठवले आहे, जेणेकरून इच्छित लाभार्थ्यांना पेन्शन वाटप त्वरित करता येईल.

लाभार्थ्यांना मार्च महिन्याची थकबाकी मिळणार का, याबाबत विचारले असता डिसोझा म्हणाले, आम्ही थकीत पेन्शनसह मार्च महिन्याची पेन्शन लवकरच वितरित करू.

डिसोझा पुढे म्हणाले की, डिसेंबरमध्ये अनेक लाभार्थ्यांची पेन्शन मंजूर करण्यात आली होती. मात्र, निधीअभावी जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांचे पेन्शन थकले होते. आता मंजूर निधीमुळे थकीत रक्कम लवकरच लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाईल. लाभार्थ्यांच्या आधार कार्ड लिंकिंगबाबत विचारले असता डिसोझा म्हणाले की, सरकारकडून यासंबंधी परिपत्रक प्राप्त झाले आहे. आम्ही त्याचा अभ्यास करत आहोत आणि लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल.



गौळीभाट – चिंबल येथे रंगपंचमी उत्सव साजरा करताना बालक व युवक.

# बायणा उड्डाणपुलावरील भिंत पाडण्याचा एमएमसीचा निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १५ :** मुरगाव नगर परिषदेने (एमएमसी) बायणा उड्डाणपुलावर सार्वजनिक प्रवेशासाठी अडथळा आणणारी मुरगाव बंदर प्राधिकरणाने (एमपीए) बांधलेली भिंत आणि दरवाजे पाडण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे. गुरुवारी झालेल्या परिषदेच्या बैठकीत सर्व २५ वॉर्डांच्या नगरसेवकांनी या ठरावाला पाठिंबा दिला.

एमपीएच्या कृतीचा निषेध एमएमसीचे अध्यक्ष गिरिश बोरकर यांनी एमपीएच्या कृतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. बायणा उड्डाणपुलाच्या लूप २च्या उद्घाटनानंतर लगेचच, एमपीएने जनतेच्या प्रवेशास अडथळा आणण्यासाठी बेकायदेशीरपणे भिंत उभारली. विचारणा केल्यावर एमपीएच्या अधिकाऱ्यांनी गैरवर्तन केले आणि माफी मागण्यास नकार दिला. त्यामुळे सार्वजनिक हिताचे रक्षण करण्यासाठी परिषदेने ही भिंत पाडण्याचा निर्णय घेतला आहे, असे बोरकर यांनी स्पष्ट केले.

भिंत पाडण्यापूर्वी नोटीस आवश्यक नाही बोरकर यांनी स्पष्ट केले की, ही भिंत बेकायदेशीर असल्याने पाडण्यापूर्वी एमपीएला नोटीस बजावण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक हितासाठी आणि कायद्याच्या चौकटीत राहून हा निर्णय घेण्यात आला आहे, असे त्यांनी नमूद केले.

जीएसएलच्या भिंतीचा मुद्दा चर्चेत गोवा शिपयार्ड लिमिटेड (जीएसएल) सोबतच्या अशाच एका मुद्द्यावर नगरसेवक दीपक नाईक यांनी चिंता व्यक्त केली. त्यांनी निदर्शनास आणून दिले की वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जीएसएलला आपली कंपाउंड वॉल आत हलवण्याची अट घालण्यात आली होती. मात्र, जीएसएलने नियमांचे पालन केले नाही.

जीएसएलसमोरील रस्ता वाहतुकीस अडथळा ठरत आहे. अनेक वेळा अपघात झाले असून जीवितहानी झाली आहे. जीएसएलने आश्वासन दिले असतानाही भिंत हलवली नाही किंवा नवीन इमारतीतून काम सुरू करण्यापूर्वी परवानगी घेतली नाही, असे नाईक यांनी सांगितले.

नियमांचे पालन न झाल्यास कारवाईचा इशारा परिषदेनं आता या प्रकरणाची तपासणी करून, पालनाची खात्री होईपर्यंत जीएसएलच्या नवीन इमारतीतील कामकाज थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

### वाडे तलावाची स्वच्छता खाजगी संस्थेला देणार

**बैठकीत वाडे तलावाच्या स्वच्छतेचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. जर चर्च तलावाची स्वच्छता राखू शकत नसेल, तर पालिकेने ही जबाबदारी खाजगी संस्थेला द्यावी, अशी भूमिका अध्यक्ष बोरकर यांनी मांडली. अनधिकृत अंत्यसंस्कार आणि हाऊसिंग बोर्ड कॉलनीचा मुद्दा पालिकेच्या परवानगीशिवाय हिंदू स्मशानभूमींमध्ये होणाऱ्या अनधिकृत अंत्यसंस्कारांवर परिषदेने तीव्र आक्षेप नोंदवला. तसेच हाऊसिंग बोर्ड कॉलनीच्या जमिनीवरील घरे नियमित करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला.**

# गोवा मोटार वाहन नियमात सुधारणा

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ **ॲप-आधारित टॅक्सी मीटरला मान्यता**

**पणजी, दि. १५ :** राज्य सरकारने कोणत्याही आक्षेपाशिवाय गोवा मोटार वाहन नियमांमध्ये सुधारणा अधिकृतपणे लागू केली आहे. या सुधारित नियमांनुसार ॲप-आधारित टॅक्सी ॲग्रीगेटर्सना त्यांच्या ॲप्लिकेशनला अधिकृत भाडे मीटर म्हणून वापरण्याची परवानगी मिळाली आहे.

या निर्णयामुळे ॲप-आधारित टॅक्सी सेवा अधिक आधुनिक आणि सुव्यवस्थित होण्याची अपेक्षा आहे. नवीन तरतुदीनुसार, जर ॲप्लिकेशन एसएमएस किंवा ईमेलद्वारे प्रवाशांना इनव्हॉइस जारी करत असेल, तर ते अधिकृत मीटर म्हणून मान्य केले जाईल. त्यामुळे वाहनात भौतिक प्रिंटर असणे आता अनिवार्य राहणार नाही.

वाहतूक विभागाने ३० जानेवारी रोजी एक सार्वजनिक सूचना जारी करून प्रस्तावित बदलांबाबत १५ दिवसांच्या आत हरकती आणि सूचना मागवल्या होत्या. मात्र, या मुदतीत कोणतेही आक्षेप किंवा सूचना प्राप्त न झाल्यामुळे सरकारने कोणताही बदल न करता दुरुस्ती लागू करण्याचा निर्णय घेतला.

नवीन सुधारित नियमांना आता अधिकृतपणे गोवा मोटार वाहन (सुधारणा) नियम, २०२५ असे नाव देण्यात आले आहे. यानुसार, गोवा मोटार वाहन नियम, १९९१च्या नियम १४० मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित नियमांनुसार, जर मोटारकॅब ॲप-आधारित ॲग्रीगेटरच्या अंतर्गत चालवली जात असेल, तर ॲप स्वतःच भाडे मीटर म्हणून वापरणे कायदेशीर मानले जाईल. यामुळे गोव्यातील टॅक्सी सेवा अधिक सोयीस्कर आणि पारदर्शक होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## निवडक



शिवोली : शिव साखळेश्वर देवाच्या पालखीत सहभागी भाविक.

### शिव साखळेश्वर देवाचा उत्सव थाटात

टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. १५ : मायणा-सडये, शिवोली येथील श्री शिव साखळेश्वर देवाचा २७वा वर्धापनदिन सोहळा थाटात झाला. उत्सवानिमित्त श्रींची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थितीत लावली, दीपज्योत उत्सव व ऑर्केस्ट्राने उत्सवाची सांगता करण्यात आली.

### शांतादुर्गा फातर्पेकरीण देवस्थानात १८ मार्चला तोपशो-गुलालोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १५ :** फातर्पा येथील श्री शांतादुर्गा फातर्पेकरीण देवस्थानात वार्षिक तोपशो – गुलालोत्सव १८ मार्च रोजी संपन्न होणार असून, त्यानिमित्त सकाळी नित्य धार्मिक विधी, संध्याकाळी ४ वाजता देवीची पालखी मंदिरातून पारंपरिक मार्गाने गुलाल उधळण्यासाठी प्रस्थान करणार आहे. तद्नंतर होळी पार करून झाल्यानंतर पालखीचे भाविकांना दर्शन घेण्यास मिळेल. नंतर पालखी मंदिरात आल्यानंतर आरती, प्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता होणार आहे. सर्व भक्तगणांनी व भाविकांनी श्रींच्या कृपा प्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती देवस्थान समितीने केली आहे.

### 'काव्यांकुर २०२५' काव्य- संग्रहासाठी कविता पाठावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १५ :** विश्व कविता दिना निमित्ताने अंत्रुजकर गोवा संस्था यंदा काव्यांकुर दि. २१ रोजी प्रसिद्ध करत आहे. २१ रोजी विश्व कविता दिन म्हणून साजरा होतो. काव्यांकुर हा कवितेला समर्पित उपक्रम असून. या वर्षी काव्यांकुर डीजीटल बुक (बहुभाषी कविता संग्रह) तयार करण्यात येणार आहे. स्वलिखित कवीता प्रसिध्द करू इच्छिणाऱ्या सगळ्यांना विनंती आहे की आपण आपली एक कविता सोमवार, दि. १७मार्च २५ पर्यंत या उपक्रमाच्या समन्वयक/संकलक श्वेतकांचन ८६००२०४७८९ या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवावी. सगळ्या कविता एकत्र करून त्याचे एक घर्रीूरपर्ज्ञी वळसळींरश्र लेज्ञ (बहुभाषी कविता संग्रह) तयार केले जाईल व २१ मार्च विश्व कविता दिनादिवशी प्रसिद्ध केला जाईल. कविता पाठवताना नावा सोबत आपला एक नावासहित फोटो शेअर करावा. असे काव्यांकूर२०२५चे निमंत्रक नीलेश नाईक यांनी कळविले आहे.



उसप : शिमगोत्सवात करवल्यांची सुवासिनी ओटी भरताना.

### उसप गावातील शिमगोत्सवाला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** डिचोली तालुक्यातील उसप या गावातील शिमगोत्सवाला सुरुवात झाली असून हा शिमगोत्सव खूप पूर्वीपासून आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करतात. गावातील लहान बालकांना करवल्या म्हणून ठेवतात . त्यांची नाकं मोत्यांच्या टोकानी टोचून नाकात मोती घालतात व करवल्या वाजत गाजत रोमतामेळ चव्हाट्यावर येतात. तेथे लहान मोठे मिळून विविध वेशभूषा परिधान करून रोमटमेळ खेळतात.त्यानंतर करवल्याचा ओटी भरण्याचा कार्यक्रम साजरा करतात. नंतर करवल्या सह रोमटामेळ पुढील तीन दिवस प्रत्येक वाड्यावर घरोघरी जातात. सुवासिनीतर्फे करवल्यांची ओटी भरतात. तसेच घोडेमोडणी, मास्तो, शिमग्याचा मान थारावणे, नाटक व सातव्या दिवशी देवीचे न्हावण दिले जाते. नंतर देवीचा कळस घरोघरी फिरविला जातो. प्रत्येक घरात कळसाची लोक मनोभावे पूजा – अर्चा करतात. त्यानंतर कळस मंदिरात आणला जाती असा हा शिमगोत्सवाचा कार्यक्रम उसप गावचे गावकरी मोठ्या भक्ती भावाने साजरा करतात.

### राज्यपालांची शैक्षणिक ट्रस्ट आणि वृद्धाश्रमाला भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** गुजराती समाज शैक्षणिक ट्रस्ट आणि स्पेशल स्कूल, मडगाव आणि नंतर डॉ. अल्फ्रेडो अंताव होम फॉर एज्ड, चांदोर येथे राज्यपाल श्री. पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी येथे भेटी दिल्या आणि दोन्ही संस्थांना प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत केली.माजी मुख्यमंत्री आणि मडगावचे आमदार दिगंबर कामत, ट्रस्टचे अध्यक्ष मुकेश सगलानी आणि इतरांनी राज्यपालांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी एम आर एम राव, आयएएस, राज्यपालांचे सचिव, मिहीर वर्धन, विशेष अधिकारी, अजित पंचवाडकर, संचालक, समाज कल्याण आणि वर्षा नाईक, संचालक उपस्थित होते. सुरवातीस ट्रस्टचे अध्यक्ष श्री मुकेश सगलानी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि गुजराती समाज शैक्षणिक ट्रस्ट आणि स्पेशल स्कूलच्या उपक्रमांची माहिती दिली. आपल्या भाषणात राज्यपालांनी भारतीय संविधानाने भारतीय जनता सर्वोच्च आहे, असे सांगितले. आमदार, मंत्री किंवा मी, आपण सर्वजण गोव्याच्या लोकांची सेवा करण्यासाठी येथे आहोत, असे राज्यपालांनी पुढे सांगितले. पुढे बोलताना राज्यपालांनी देवाच्या कृपेने राज्यासाठी योगदान देण्याचे मला भाग्य लाभले आहे. लोकांची सेवा ही देवाची प्राप्ती करण्याचा एक मार्ग आहे आणि राजभवनाच्या माध्यमातून सेवाभिमुख उपक्रम सुरू ठेवण्याचे माझे ध्येय आहे, जे 'लोकभवन' असावे असे मला वाटते असे सांगितले. राज्यपालांनी गोव्यातील लोकांना मनापासून संबंध निर्माण करण्यासाठी राजभवनला भेट देण्याचे आमंत्रण दिले. आमदार दिगंबर कामत यांनी राज्यपाल श्रीधरन पिल्लई हे एक अद्वितीय राज्यपाल आहेत, ज्यांनी संपूर्ण गोव्यात प्रवास केला आहे आणि गोव्यातील लोकांना भेडसावणाऱ्या समस्यांशी स्वतःला परिचित केले आहे. त्यांनी लोकांशी संवाद साधला आहे आणि त्यासाठी ते राज्यातील गरजू लोकांना मदत करीत आहेत असे श्री कामत पुढे म्हणाले. आमदार कामत पुढे म्हणाले की, ट्रस्टला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आणि सांगितले की गुजराती समाज शैक्षणिक ट्रस्ट मुलांना मदत करण्यासाठी आणि त्यांना पालकांचे प्रेम आणि आपुलकी देण्यासाठी सतत कार्यरत आहे असे सांगितले. विशेष अधिकारी श्री मिहीर वर्धन यांनी राजभवनाने राबविलेल्या विविध उपक्रमांबद्दलची माहिती दिली आणि राज्यातील गरजू रुग्णांना आणि ९७ संस्थांना ६.२६ कोटी रुपयांपेक्षा जास्त आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती दिली.
ाज्यपालांनी गुजराती समाजाचे अध्यक्ष संतोष पोलकर, देवीदास सुरवंत, झहीर शेख आणि सुनीता फर्नांडिस यांना आर्थिक मदत सुपूर्द केली.
चांदोर येथे आगमन झाल्यावर विरोधी पक्षनेते युरी आलेमाव, डॉ. अल्फ्रेड अंताव होम फॉर एज्डचे अध्यक्ष जॅसिंतो फर्नांडिस आणि इतरांनी राज्यपालांचे पुष्प अर्पण करून स्वागत केले. यावेळी सरपंच युजिनियो डायस आणि पंच उपस्थित होते.